# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७१ / ७२/ ७३ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,

संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in ई-मेल: est.section@sus.ac.in, registrar@sus.ac.in,

NAAC Accredited-2015 'B' Grade (CGPA 2.62)




आस्थापना विभाग

## प रि प त्र क

सर्व शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थींनी यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, शुक्रवार दि. १२/०२/२०२१ रोजी महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालय @ सोलापूर हा उपक्रम प्रस्तुत विद्यापीठात सकाळी ११ : ०० वा. आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमात महाराष्ट्राचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री मा. श्री. उदयजी सामंत हे उपस्थित राहून विद्यार्थी, पालक, शिक्षक, प्राचार्य, शिक्षकेत्त कर्मचारी, विद्यापीठ कर्मचारी व शैक्षणिक संस्था आदी विविध घटकांच्या अडीअडचणी ऐकून घेऊन त्या सोडविणार आहेत.

सदर उपक्रम हा **दि.१२/०२/२०२१ रोजी आयोजित केला असल्याने कार्यालयाची वेळ सकाळी ०९ : ०० ते सायंकाळी ०५ : ०० पर्यंत** राहील. तसेच सर्वांनी सदर दिवशी विद्यापीठाने संबंधितांना दिलेले ओळखपत्र दर्शनी भागात परिधान करणे व ज्या कर्मचाऱ्यांना विद्यापीठाने गणवेश पुरविले आहे त्यांनी गणवेश परिधान करणे अनिवार्य आहे. कोव्हिड-१९ विषयी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

जा.क्र. पुअहोसोविसो/आस्था/२०२१/1279
दिनांक : 10 FEB 2021

(प्रा. डॉ. वि. भा. घुटे)
प्र. कुलसचिव

प्रत :

१ सर्व प्रशासकीय विभाग प्रमुख, प्रस्तुत विद्यापीठ
२ सर्व शैक्षणिक विभाग प्रमुख, प्रस्तुत विद्यापीठ
३ अभ्यासकेंद्र, रंगभवन, सोलापूर.
४ मा. प्राचार्य/संस्थापक, सर्व संलग्नित महाविद्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

सदर परिपत्रक आपल्या विभाग/संकुलातील सर्व शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी/विद्यार्थीनी यांच्या निदर्शनास आणून द्यावे.